

# नागरिकांची सनद

## (सिटीझन चार्टर)

## ग्राम विकास व जलसंधारण विभाग

(जलसंधारण विभाग)

## जलसंधारण विभाग
## नागरिकांची सनद

प्रस्तावना

**१.१** महाराष्ट्र हे देशातील दुस-या क्रमांकाचे मोठे राज्य असून या राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३०७.७१३ लक्ष हेक्टर इतके आहे. राज्याचे प्रशासकीय दृष्ट्या ६ महसूल विभाग, ३५ जिल्हे ३५८ तालुक्यात विभाजन करण्यात आले असून राज्यातील शहरे व गावांची संख्या अनुक्रमे ३३६ आणि ४१०९५ इतकी आहे. राज्याची एकूण लोकसंख्या ११२.३७ दशलक्ष असून त्यापैकी ४५.२ टक्के लोक शहरी भागात राहतात. लोकसंख्या वाढ व इतर जैविक दबावामुळे ग्रामीण भागातील भूमी, जल आणि इतर नैसर्गिक साधनसंपत्ती अवनत झाल्याने ग्रामीण भागातून लोकांचे शहरी विभागातील स्थलांतरणात निरंतर वाढ होत आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येपैकी १०.६४५ दशलक्ष लोक शहरी भागातील झोपडपट्टीत राहतात.

**१.२** राज्यातील पाणलोट क्षेत्राचे २ प्रभाग, ६ नदीखोरे, १६ जलग्रहण क्षेत्र, ७४ उपजलग्रहण क्षेत्र, ३९६ राष्ट्रीय स्तरांचे पाणलोट, १५३१ उप पाणलोट आणि अंदाजे ६०,००० पाणलोट क्षेत्रात वर्गीकरण करण्यात आले आहे. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यातील १०४ तालुक्यात जमिनीच्या धूपीमुळे पाण्याच्या उपलब्धतेत घट होत आहे. कृष्णा व तापी खो-यात राज्याच्या एकूण भूपृष्ठावरील ३८.४ टक्के भाग समाविष्ट असून या खो-यात पाण्याची कमतरता इतर भागापेक्षा जास्त आहे. जमिनीची धूप आणि पाण्याच्या कमतरतेमुळे कृषी, वने व पशुपैदास सारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारीत उद्योगांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेत असमतोल निर्माण झाला आहे.

**२.१ जलसंधारण विभागाची स्थापना:-** लोकसहभाग आधारीत तसेच नैसर्गिक साधनसंपत्ती आधारीत राज्यातील ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने ५जून , १९९२ मध्ये जलसंधारण विभागाची स्थापना केली. या विभागाकडे जल, मृदसंधारण, एकात्मिक पाणलोट विकास, लघु सिंचन, सामाजिक वनीकरण, पडीक जमीन विकास यासारख्या महत्वपूर्ण केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचे संनियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या व्यतिरिक्त या विभागाद्वारे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम ही केंद्र पुरस्कृत योजना तसेच आदर्श गाव योजना ही राज्य शासन पुरस्कृत महत्वपूर्ण योजना यांचे संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यात येते.

**२.२** सन १९९५ पासून सुरु झालेल्या अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, आश्वासित रोजगार योजना आणि एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांमध्ये लोक सहभाग आधारीत पाणलोट विकास कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले असून त्यांच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे. नोव्हेंबर, २००० पासून केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रमात सुध्दा लोकसहभाग आधारीत व्यवस्थापनाचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

**२.३** महाराष्ट्र राज्यात सामाजिक वनीकरण व पाटबंधारे प्रकल्प यासह पाणलोट व जलसंधारण कामाचे प्रचलन आणि शीघ्र विकास आणि नियमन करण्यासाठी व त्यांच्याशी संबंधित बाबींकरिता विशेष तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना २२ ऑगस्ट २००० मध्ये करण्यात आली असून त्याचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे.

**३.१ जलसंधारण विभागाची कार्ये व अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये:-** मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे व प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण यांच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी या विभागाच्या अधिपत्याखाली आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम, नदीखोरे योजना, आदर्श गाव योजना या योजनांच्या अंमलबजावणीकरिता अर्थसंकल्पीय तरतूद या विभागाद्वारे केली जात असून त्याची अंमलबजावणी कृषी विभागाद्वारे केली जाते. १०० हेक्टर पर्यंत लघु पाटबंधारे संबंधित योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत केली जात असून त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद या विभागाद्वारे उपलब्ध केली जाते. तसेच १०१ ते २५० हेक्टर सिंचन योजनांची अंमलबजावणी मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), यांचेमार्फत करण्यात येते.

**३.२** अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, एकात्मिक पडीक जमीन विकास कार्यक्रम व हरियाली या कार्यक्रमासाठी लागणा-या राज्य हिश्याची अर्थसंकल्पीय तरतूद या विभागाद्वारे केली जात असून सदर तरतूद जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना अनुदानाच्या स्वरुपात वितरित केली जाते. या विभागांतर्गत उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीचा मोठा भाग पंचायत राज संस्थांमार्फत ग्रामीण विकास कामावर खर्च केला जातो.

**३.३** जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये व त्या कार्यालयांकडून राबविण्यात येणा-या योजना/ कार्यक्रम खालीलप्रमाणे:-

| अ.क. | क्षेत्रीय कार्यालयाचे नाव व मुख्यालय | राबविल्या जाणा-या योजना /कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), महाराष्ट्र राज्य,बंगला नं.१२ जेल रोड, येरवडा, पुणे-४११ ००६. | १०१ ते २५० हेक्टर सिंचन योजनांची अंमलबजावणी |
| २ | प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक सामाजिक वनीकरण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे -४११ ००१. | सामाजिक वनीकरणासंबंधी योजनांची अंमलबजावणी |
| ३ | महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ,नवीन प्रशासकीय इमारत,तळ मजला, औरंगाबाद ४३१ ००१. | राज्यातील लघु सिंचन प्रकल्प तसेच पाणलोट जलसंधारण व सामाजिक वनीकरण कामाचे प्रचलन आणि शीघ्र विकास व नियमन व त्यांच्याशी संबंधीत बाबी |
| ४ | संचालक, मृदसंधरण व पाणलोट व्यवस्थापन , पुणे४११ ००१. | मृद संधारण योजना व राष्ट्रीय कृषि विकास योजना |

**४.१ जलसंधारण विभागाची रचना व हाताळण्यात येणारे विषय:-** मा.मंत्री जलसंधारण व मा.राज्यमंत्री जलसंधारण या प्रभारी मंत्री महोदयांच्या अधिपत्याखाली या विभागाचे सचिवांसह ३ सह सचिव/उप सचिव व अन्य १४ अवर सचिव/कार्यासन अधिकारी आहेत. त्यांच्याकडे या विभागाकडील सर्व विषयांची विभागणी परिशिष्ट १ मध्ये दिलेल्या तक्त्याप्रमाणे करण्यात आलेली आहे.संबंधित विषयाचे अंतीम शासन मंजूरीचे शासन निर्णय त्या त्या कार्यासनामार्फत निर्गमित केले जातात.

**४.२** विभागामार्फत कोणा एका व्यक्तिस कोणतीही सेवा थेट पुरविली जात नाही,लोकसमुहास सेवा पुरविल्या जातात.मृद , जलसंधारण व सामाजिक वनीकरण या योजनांचे राज्यस्तरीय पर्यवेक्षक व संनियंत्रणाचे काम पाहिले जाते.हे कार्यक्रम राबविण्यासाठी विभागामार्फत निधी वाटप करण्यात येते.

**४.३.** या विभागाशी संबंधित कायदे /नियम तथा महत्त्वाचे शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणा-या कायदे /नियम तथा शासन निर्णयाबाबतची माहिती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात येते.

**५. अ) गाऱ्हाणी व तक्रारी यांचे निराकरण :-** कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी पृष्ठ-४ व ५ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात त्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. या उपरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित प्रधान सचिवांकडे याबाबत त्यांना दाद मागता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत /पत्राने तथा ई-मेल द्वारेही मांडता येतील.

**ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा /सिंहावलोकन :-** या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सामान्य प्रशासन विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

**क) जनसामान्यांकडून सूचना :-** ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. जलसंधारण उप विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी ही सनद नेहमीच उपयुक्त राहील.

**६. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-** नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास जलसंधारण उप विभाग कटिबद्ध आहे, सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरीकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

जलसंधारण विभाग आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे, या सेवा पुरवितांना नागरिकांना सौजन्यपूर्वक वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्यांची राहील.

---------------

परिशिष्ट-१

# जलसंधारण विभाग

## सचिव

## २२०२५३४९ / २२७९३९३४

## स्वीय सहाय्यक २२७९३०६३

| **सहसचिव ( आस्थापना )**<br>**२२८४३८५६/२२७९३५४४** | **उपसचिव(अर्थसंकल्प)**<br>**२२८४५८८३/** | **उपसचिव(कार्यक्रम)**<br>**२२०२९६४६/२२७९३२२२** |
|---|---|---|
| **अवर सचिव-जल-१०**<br>**२२८४५६८३/२२७९३१०२**<br>मृदसंधारण योजनेतील वर्ग-१ व २ अधिका-यांविरूध्द भ्रष्टाचार विषयक तक्रारी, विभागीय चौकशी, शिस्त व अपिल इ.प्रकरणे<br>**सहाय्यक संचालक- जल-१९**<br>**२२८४५६८३/२२७९३१०२**<br>विनियोजन लेखे,नागरी अहवाल याचा समन्वय,जलसंधारण विभागांतर्गत क्षेत्रीय यंत्रणाकडील महालेखापालांच्या प्रलंबीत परिच्छेदा बाबत समन्वय<br>**अवर सचिव जल-२३-**<br>**२२७९३५१७**<br>थकीत प्रकरणांचा मासिक अहवाल<br>मुख्यमंत्री कार्यालयाकडून जल-संघारण विभागास आलेल्या पत्रांचा म्हणजेच विकाक प्रकरणांचा आढावा<br>माहितीचा अधिकार मासिक अहवाल,<br>नागरिकांची सनद<br>**कार्यासन अधिकारी जल-२४-**<br>**२२७९३०१३**<br>विधीमंडळ कामकाज समन्वय, तारांकित प्रश्न,अतारांकित प्रश्न, आश्वासनाचा पाठपुरावा,<br>मा.राज्यपालांचे भाषण(समन्वय)<br>मा.मुख्यमंत्र्यांचे भाषण(समन्वय)<br>मा.वित्तमंत्र्यांचे भाषण(समन्वय) | **कार्यासन अधिकारी-जल-११**<br>**२२७९३३८३**<br>जलसंधारण विभागाच्या अर्थ संकल्पीय बाबींचे समन्वय, कपात सूचना (समन्वय)<br>**अवर सचिव जल-१२**<br>**२२७९३१०६**<br>सामाजिक वनीकरण धोरण सामाजिक वनीकरण विषयक तक्रारी, सामाजिक वनीकरण जाहिरात प्रसिध्दी व प्रशिक्षण,शासकीय रोपवाटिकांचे बळकटीकरण व आधुनिकी करण,राष्ट्रीय बांबू मिशन अभियान, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, वनमहोत्सव, वृक्षपट्टा योजना, मिवाडा, खाजगी जमिनीवर वृक्ष लागवड<br>**अवर सचिव जल-१३**<br>**२२८४५६८३/२२७९३१०२**<br>सामाजिक वनीकरण आस्थापना विषयक सर्व बाबी, सामाजिक वनीकरण कर्मचा-यांच्या तक्रारी, विभागीय चौकशी-सौम्य शिक्षा, सामाजिक वनीकरण कर्मचा-यां च्या प्रशिक्षण व नियुक्तिबाबत<br>जलसंधारण विभागाशी संबंधित विधान मंडळाच्या लोकलेखा समिती वगळून विविध समित्यांच्या शिफारसींवर करण्यात आलेल्या | **कार्यासन अधिकारी जल-१**<br>**२२७९४०४२**<br>१०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंतच्या लघु सिंचन योजनांना तांत्रिक/प्रशासकीय मान्यता देणे, लघु सिंचन योजनांच्या सर्व धोरण विषयक बाबी, लघु सिंचन योजनांचे बाह्य अर्थसहाय्याचे प्रस्ताव हाताळणे, लघु सिंचन योजनांच्या बांधकामाबाबतच्या १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेपर्यंतच्या सर्व तक्रारी हाताळणे, त्याबाबत क्षेत्रीय अधिका-यांकडून माहिती मागवून, त्याची छाननी करून प्रकरणे सादर करणे, लघु सिंचन प्रकल्प बांधकामा- बाबत आर्थिक मापदण्ड सुधारीत करण्याची कार्यवाही करणे,क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्प अंमलबजावणी /संनियंत्रण, राष्ट्रीय कृषी विकास योजना अंमलबजावणी /संनियंत्रण, लघु सिंचन प्रकल्पाची पडताळणी तपासणी व प्रगणना, केंद्र पुरस्कृत योजना अंमलबजावणी व संनियंत्रण.<br>**अवर सचिव जल-२- २२८४५६८३**<br>लघु सिंचन(जलसंधारण) व लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद ) विभागाच्या आस्थापना विषयक व प्रशासकीय बाबी, लघु सिंचन (जलसंधारण) व लघु पाटबंधारे (जि. प. ) विभागाची यंत्रसामुग्री व वाहन खरेदी |

| | | |
|---|---|---|
| | कार्यवाहीबाबतची माहिती विधान मंडळाला कळविण्याचे समन्वय , पंचायत राज समितीचे विधान मंडळाला कळविण्याचे समन्वय | लघु सिंचन(जलसंधारण) व लघु पाटबंधारे (जि. प. ) विभागाची विभागीय चौकशी आदेशित करावयाची प्रकरणे.<br>लघु सिंचन(जलसंधारण) व लघु पाटबंधारे (जि.प. ) विभागाची गैरव्यवहार व भ्रष्टाचारविषयक तक्रारी<br>**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**<br>**कार्यासन अधिकारी-जल-३**<br>**२२८४३८५६**<br>जलसंधारण महामंडळा संबंधित सर्व बाबी सुधारीत प्रशासकीय मान्यतेसह, १०० हेक्टर पर्यंत सिंचन क्षमता असलेल्या जिल्हा परिषदेकडील लघु सिंचन योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात प्राप्त होणारे अर्ज, तक्रारी, निवेदने, लोकलेखा समिती, विनियोलन लेखे इत्यादीवर कार्यवाही करणे<br>**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**<br>**कार्यासन अधिकारी-जल-४**<br>**२२७९३३८३**<br>लघु सिंचन विषयक अर्थसंकल्प तयार करणे, निधी वितरण करणे,विशेष पॅकेजेस केंद्र पुरस्कृत योजना अंमलबजावणी संनियंत्रण,<br>**अवर सचिव- जल-७**<br>**२२७९३१०१**<br>गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम, चेकडॅम,<br>विदर्भ मराठवाडा कोकण व नाशिक विभाग पाणलोट विकास कार्यक्रम मृदसंधारण विषयक धोरणात्मक बाबी मापदण्डा- सह, पाणलोट विकास समन्वय जिल्हा विभाग व राज्य स्तरीय |

| | | |
|---|---|---|
| | | समिती, मृदसंधारण योजना विनियोजन लेखे, राष्ट्रीय कृषी विषयक योजना व इतर योजना सिमेंट नालाबांध व वळण बंधारे, केंद्र पुरस्कृत योजना अंमलबजावणी व संनियंत्रण, मृदसंधारण उपचारा मधील गाळ काढणे अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या शेत जमिनीची दुरूस्ती नाशिक विभाग पाणलोट विकास कार्यक्रम मृदसंधारण विषयक धोरणा-त्मक बाबी मापदण्डासह,पाणलोट विकास समन्वय जिल्हा विभाग व राज्य स्तरीय समिती, मृदसंधारण योजना विनियोजन लेखे,राष्ट्रीय कृषी विषयक योजना व इतर योजना सिमेंट नालाबांध व वळण बंधारे, केंद्र पुरस्कृत योजना अंमलबजावणी व संनियंत्रण, मृदसंधारण उपचारा मधील<br>गाळ काढणे,अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या शेत जमिनीची दुरूस्ती<br>**अवर सचिव जल-८ २२७९३१०१**<br>राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम<br>नदी खोरे प्रकल्प,आदर्श गाव विकास कार्यक्रम,एकात्मिक पाणलोट व्यव - स्थापन कार्यक्रम, पाणलोट विकास चळवळ प्रसिध्दी बक्षीस योजना,सरदार सरोवर प्रकल्पाशी संबंधित बाबी.<br>**अवर सचिव जल-२० २२७९३१०६**<br>अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम,हरियाली २००३, एकात्मिक पडीक विकास कार्यक्रम,महाराष्ट्र जलसंधारण सल्लागार परिषद,राष्ट्रीय कृषी विकास योजना-शेततळे व बोडी दुरूस्ती,वरील योजनांशी संबंधित महालेखापालाचा नागरी अहवाल. |

-------------------------------------------------------